म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५६९

# औदुंबर

प्रफुल्लदत्त

REFBK-0025558
REFBK-0025558

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 AUG 1988

( क्रु. मा. पद्दा )
५०००–११–८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# औदुंबर

प्रफुल्लदत्त

REFBK-0025558
REFBK-0025558

औदुंबर

प्रफुल्लदत्त

प्रथमावृत्ती : डिसेंबर, १९८७.

© श्रीमती विद्या दत्तात्रेय तेंडूलकर
१२२, 'रुक्मिणी-स्मरण'
तेलंग क्रॉस रोड
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.

**प्रकाशक :**
मनोहर चंपानेरकर
रोहन प्रकाशन
ए-३/५ सुंदर नगर
एस्.व्ही. रोड,
मालाड पश्चिम
मुंबई ४०० ०६४.

मुखपृष्ठ : रविमुकूल
मुखपृष्ठ छपाई : मौज

**छपाई :**
सा.रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ
पुणे ४११ ०३०.

---

**किंमत : पंचवीस रुपये फक्त.**

# औदुंबर

प्रफुल्लदत्त

काव्यप्रेमी
रसिकांना
ही
औदूंबराची छाया



वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज

यांचा अभिप्राय

स्वागत :

कवी प्रफुल्लदत्त हे मराठीतील एक नामांकित आणि स्वतःचे एक वेगळे स्थान असलेले कवी. रविकिरण मंडळाच्या आणि नंतरच्या नजीकच्या काळात त्यांची प्रतिभा बहरली. बदलत्या काळानुसार काव्याचा आशय बदलत जातो, पण संवेदनशील वयात मनात ठसलेले आकार अनेकदा तेच राहतात. मराठी काव्यात परिवर्तन घडवून आणणाऱ्या मर्ढेकरांनीसुद्धा सामान्यतः पारंपरिक छंद-वृत्तांचा स्वीकार केला आहे.

प्रफुल्लदत्तही रचनाप्रकारांच्या दृष्टीने रूढ आणि पारंपरिक आविष्काराशी बांधलेले होते. पण आशयाच्या आणि काव्यानुभवाच्या दृष्टीने त्यांची कविता एकाच ठिकाणी थांबलेली नाही. आणि विविध वृत्तप्रकारांवरील प्रभुत्व आणि रसाळ, सुबोध शैली, यामुळे त्यांची कविता नेहमीच रसिकांना स्वागतार्ह वाटलेली आहे.

प्रफुल्लदत्तांची काव्यावर अपार निष्ठा होती. किंबहुना तो त्यांचा जीवनमंत्र होता. काव्य लिहिणे, वाचणे, उपभोगणे आणि आपल्याला लाभलेला आनंद इतरांपर्यंत पोचविणे, यात त्यांना

परम समाधान मिळत असे. काव्यपंढरीचे निष्ठावंत वारकरी असेच त्यांचे वर्णन करता येईल. पेशाने ते शिक्षक होते, आणि उत्तम शिक्षक होते. या अध्यापनालाही त्यांनी काव्याची बैठक दिलेली होती. ' सर काव्यच बोलत आणि काव्य शिकवीत असताना तर काव्यमयच होत ', असे त्यांचे विद्यार्थी सांगतात. असा काव्यविश्वाचा रहिवासी असलेला हा कवी आणि रसवेत्ता. त्यांचे काव्यलेखन त्यांच्या अंतःकरणापासून दूर कधीच गेले नाही. लौकिकासाठी, धनार्जनासाठी वा मागणी पुरविण्यासाठी त्यांनी लेखणी कधी उचलली नाही. ' अंतरीचे बाहेर धावे ' असेच त्यांच्या

काव्याचे स्वरूप होते आणि त्याचाच प्रत्यय या कणिकासंग्रहात येतो. या कणिका म्हणजे त्यांच्या जीवनप्रवासातील विविध अनुभवांची, भावविचारांची काव्यमय नोंद आहे. स्वतःशी केलेला हा ललितरम्य संवाद आहे.

प्रेम-प्रणयापासून जीवनहेतूच्या शोधापर्यंत अनेक विषय यात आलेले आहेत. संसारयात्रेतील हे सहजोद्गार, कवीच्या खास रसाळ, नितळ शैलीमुळे वाचकांना आल्हाददायक वाटतील असा मला विश्वास वाटतो.

**वि. वा. शिरवाडकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# औदुंबर

[illegible]

औदुंबराच्या छायेत
भाव अंतर्मुख
आसमंताचा विसर
थिटी सारी सुखं
इथे वृत्तीत उतरे
वेगळीच लय
क्षितिजांच्या वलयांचे
होते देवालय
अठ्ठावीस अक्षरांची
आत्म्याच्या चिऱ्यांची
आहे घडण वेगळी
त्याच्या चौथऱ्याची
वेदनेवाचून इथे
नाही निश्वसित
कळ येता विव्हळतो
होतो विश्वजीत
चिंतनातील आशय
चरणी सामावे
प्रतिभेच्या भावबळे
आकाशही लवे

२९-९-८३ —प्रफुल्ल-दत्त

१

माझे एक विश्व आहे
त्यातील मी अणु
रसलुब्ध होता मन
लागे गुणगुणू

१८-५-८१

२

महापूर वळे तेव्हा
नदीला ये माज
कटिबंध उधळून
उतरवी साज

३

स्त्री सहज ओळखते
पुरुषी नजर
हवं त्याच्याच कानाशी
लावते गजर

४

सम्राटसूर्य उषेच्या
आलिंगना लवे
केविलवाणे होऊन
जळतात दिवे

५

तुझे जिणे माझ्यासाठी
        केव्हाच ये जाण
नको त्याला देह दिला
        तरी तुला प्राण

६

म्हणे 'शोकिनाना प्रिय
        नेत्याहूनि नटी'
कुणा नको न्याहाळाया
        लचकती कटी ?

७

**अनुच्चार**

अनुच्चारित असावे
        दिलातले दान
समाधान अभिलाषी
        सन्मान ना मान        १८-५-८१

८

नीति तेजोगर्भा तरी
        उणेपणा दर्शी
प्रीति रसग्राही हंसी
        नवनवोन्मेषी        १९-५-८१

९

दैनंदिन प्रश्ना, पुरे
निवृत्ती वेतन
ब्रह्मानंदासाठी मन
शांति-निकेतन

११-५-८१

१०

पुंगीच्या गुंगीत नाग
विसरतो वीष
तुझ्या स्मृतीत माझेही
मन होते पीस १२-५-८१

११

प्रचीतीच्या पावलांनी
परतला गावी
कुणी म्हणाले नाही त्या
व्यथा ऐकवावी ११-५-८१

१२

एखाद्या वस्तूचा हवा
असूनही भोग
तो नाकारण्याची शक्ति
अनासक्ति योग १८-५-८१

१३

अंधारता भोवताल
दिवाभीता दृष्टि
असूयेने जागतसे
तामसाची सृष्टी

१४

प्रासादस्थ पक्ष्यांची
झुंज वादळाशी
इतर लहरतात
दरीच्या तळाशी

१३-५-८१

१५

सोपं नाही लढवणं
प्रणयाची गढी
कुणीतरी हवा आत
फितूर सोंगडी

१२-५-८१

१६

युद्धाच्या धुमश्चक्रीत
तो नेहमी मागे
त्याचे बहिर्जीचे मन
अष्टदिशा जागे

१७

कुणाच्याही शेजेसाठी
नाही माझी बाजी
मिरवितो मस्तानी जी
प्रीति रणगाजी

१८

कुठेही भोगता येते
इष्काची लज्जत
तो-ती राजी तर जाते
कुणाची इज्जत

७-५-८१

१९

विवाहाच्या वेदीवर
जरी उभे दोघे
बुलबुलांचे हिंदोल
तरी आगे-मागे. ७-१-८१

२०

दुरूनच पाहते मी
लग्नाची वरात
एकेकीच्या सौभाग्याने
कलबले उरात ७-५-८१

२१
रति घटकात ज्यांना
अंगसंग पुरा
स्थिर चित्ते वाहती ते
प्रपंचाची धुरा ७-५-८१

२२
मेघाची मिळता फूस
ऊतू जाते नदी
कलंदराच्या मिठीत
स्रीही तशी कधी
७-५-८१

२३
अंधार म्हणाला, ' सूर्या !
टाकीन ग्रासून '
ग्रहणाचे भय त्याला
त्या क्षणापासून ७-५-८१

२४
इथे आलेल्यांना गती
आहे सरणाची
तेव्हा फुलवावी वाट
जन्म–मरणाची ७-५-८१

२५

येताना काही आणलं
        नाही, खरं नाही
देता येत नाही कुणा
        अंतस्थाची ग्वाही        ७-५-८१

२६

आत्म्याशी संवाद : एक
        सहज समाधी
इतरांशी बोली चाली
        व्याधी उपाधी

७-५-८१

२७

' आकाशाचा भार ' म्हणे
        ' मीच शिरी वाही '
सदैव तुपात त्याची
        भिजलेली बाही

२८

एकांत साधे तो जागे
        सिद्ध महायोगी
तो जगन्नाथही
        लौकिकाचा भोगी.        ७-५-८१

२९

भुईफुलांची का कुणी
मोजदाद करी
साऱ्याच अवस्थेत ती
पायवाटेवरी ७-५-८१

३०

तुझ्या दुःखाने कढतो
म्हणून मी तुझा
तशी अनेकांची आहे
तुझ्याकडे ये जा

८-१-८१

३१

पशू असतो बहुधा
जागता दरीत
बेसावध हिंडणारे
सावज हेरीत ८-५-८१

३२

गुंतवून घे मनाला
हव्या त्या छंदात
सुखासाठी पडू नको
नसत्या फंदात ८-५-८१

३३
उधाणून देणाराचा
पाहून तळवा
'अजिंक्य नाहीस तू' हे
मृत्यूला कळवा

८-५-८१

३४
मी कसा, हे माझ्याआधी
तू ओळखलेस
उघडली असती मी
भलतीच वेस
८-५-८१

३५
किती क्लेश, अजून तू
भेटूसच नये
येऊच नको आता
मी गेल्यावर ये
९-५-८१

३६
पुढ्यात आलेल्याचा तो
घेई भोग पुरा
देहस्वास्थ्यासाठी पथ्य
नाही चूर्ण पुरा

३७

नसेसना का तू माझ्या
    हाकेच्या कक्षेत
दूरस्थ मी तरी तुझ्या
    प्रीतिच्या दीक्षेत

३८

कल्पित सुख देणारी
    मैथुनाची धुंदी
क्षणात ओसरताच
    वृत्ति शरमिंधी

३९

विचारांना अवसर
    चिंतनाच्या लयी
नक्षत्रे उतरतात
    शांत जलाशयी

९-५-८१

४०

उषेच्या प्रेरणेतून
    सूर्य घेतो गती
कर्मयोगी जीवनात
    अव्याहत रती

९-५-८१

४१

**दिमाख**

दिमाखात उसवीत
        पैठणीचे धागे
अंगांगातून करी ती
        प्रलोभन जागे

८-५-८१

४२

मी नसता काही काळ
        करशील त्रागा
तू नसता मात्र माझी
        थडग्यात जागा

९-१-८१

४३

**जवळीक**

कफल्लक झालो तेव्हा
        होतीस जवळ
समजून घेतलेस
        तेच भावबळ

८-५-८१

४४

कुबेराच्या दारी उभे
आक्रमक श्वान
'छू' म्हणताच हवं त्याची
आवळाया मान १०-५-८१

४५

तुझ्याजवळ बसलो
नाही, हवं तेव्हा
आता ज्वालामुखीतून
उफाळतो लाव्हा

१०-५-८१

४६

मी पाहिले त्याचे हात
ते खुल्या मुठीचे
कटीचे वस्त्र नव्हते
आतल्या गाठीचे

४७

माझी नाहीस तरीही
आपले म्हटले
दिलाच्या ओढीला जग
म्हणते 'खटले'

४८

ऋतूंच्या मनोधर्मात
        तफावत किती ?
ग्रीष्म योगभ्रष्ट तर
        वर्षा भोगवती

४९

'माझे' 'माझे' म्हटलेले
        ओझे होते अंती
अखेरच्या दिवसात
        हवी मनःशांती

५०

'आत' मी असतो 'ससा'
        'बाहेर' 'कासव'
मनाच्या गतीला माझ्या
        दुःखाचे आसव

५१

मन भरारे कधीच
        हवे तिच्या वक्षी
नको मानसपूजेला
        अक्षतांच्या साक्षी

५२

मणके निखळले की
ढिला होतो कणा
सर्पाचा दर्पही मग
उभारी न फणा

५३

' तेजोगर्भा माझी कूस '
अहंकारे उषा
संध्या लवे, म्हणे ' तुझी
रक्षी मी मंजुषा '

५४

**योग**

योग्यता गेली खचून
साधताना योग
उगाच का म्हणे जग
' नशिबाचा भोग '

५५

पाषाणाच्या मूर्तीपुढे
केवढी आरास
आणि उष्ट्या पक्वान्नांचा
अपंगांना घास

५६

मागले दोर कापले
        तर मोक्ष हाती
नाहीतर जन्मभर
        नको त्यांशी नाती

५७

त्याच्या शिणल्या डोळ्यात
        ठसे रोजमेळ
तोच जागत्या स्वप्नांचा
        अखेरचा खेळ

५८

ग्रीष्माच्या राखेतून
        वर्षा राहे उभी
काल जे जे नामशेष
        चढे आज नभी

५९

पाठोपाठची भावंडे
        वेगवेगळ्या रंगांची
मीलनाची घडी नसे
        आत्म्याच्या संगाची

६०

मी असते आत, तुला
कशी देऊ दाद ?
' तुझे येणे ' हाच तर
आमच्यात वाद

६१

**गैरसमज**

कुणाजवळ बोलत
नसे तो फारसा
जो तो म्हणे आता त्याला
संतांचा वारसा

१८-५-८१

६२

**कामासक्त**

पहाडात कोरलेली
अजिंठ्याची लेणी
कुणी कामासक्त पाही
म्हणे ' जीवघेणी '

६३

**वृत्ति**

अनीतिच्या मोहरांनी
भरलेले खिसे
ज्याचे, त्याला जिथे तिथे
दुःशासन दिसे

६४

सोन्याच्या तारेत ज्यांच्या
संसाराच्या गाठी
पापण्यांना स्नान त्यांच्या
करुणेच्या काठी

६५

ती होती देवघरात
मूर्तीपुढे उभी
एकांतात न्याहाळीत
आपलीच छबी

६६

संयमी सारथ्य करी,
सूर्याच्या रथाचे
त्याला नाही उणे-दुणे
लौकिक व्यथांचे

६७

नको उभी सारी सुखे
माझ्या पायरीशी
हवी जागत्या शल्यांची
उरी कासाविशी

६८

माझ्यापुढे ठेवलास
आदर्श रतीचा
त्यामुळे चढत गेला
आलेख गतीचा

६९

नृत्य : पदन्यासातील
एक भावव्यक्ति
कक्षेत : तितकी त्यात
कलात्मक शक्ति

७०

ऋतुचक्राच्या फेऱ्यात
साऱ्यांची भ्रमंति
मरणाच्या शय्येवर
अखेर विश्रांती

७१

खरा भक्त साजे उभा
उंबऱ्याबाहेर
दर्शनेही देता येतो
आत्म्याचा आहेर

७२

निळ्या मोकळ्या वाऱ्यात
पाखरे निर्भय
जीवन्मुक्तांना कोठली
मरणाची सय ?

७३

चिंतनाच्या समाधीत
प्रतिभेशी संग
नेणताच कवितेच
निळे अंतरंग

७४

**स्त्री**

बेलगाम होता काम
पेली त्याला वक्षी
वीज त्याच्या चैतन्याची
गर्भाशयी रक्षी

७५

पाह्यचेच मला, तर
पहा एकांतात
तीच खरी माझ्यातील
माणसाची जात

७६

रतिप्रिया असूनही
पतिव्रता आहे
तिचे नाव चिन्तनिका
बंदिस्तीत राहे

७७

अष्टदिशांच्या सर्पांचा
संग अहर्निश
शिव तपोबले त्यांचे
उतरवी विष

७८

'लोभ असो' विनंतीने
पत्र होते पुरे
व्रतस्थही ऊतू जाते
तेच प्रेम खरे

७९

भेटतात किती, पण
अंतस्थ विरळा
ग्रीष्मातील वादळात
विरतो धुरळा

८०

कशी म्हणू तुझी ? नाही
विसावले स्कंधी
'तुझे'पण झंकारले
नाही रोमरंध्री

८१

कधीच झाला नाहीस
इतरांसारखा
म्हणून लक्षात, तुझ्या
येण्याच्या तारखा.

८२

मनाच्या वळचणीत
जागणारी पाल
अपरात्रीही व्यथेशी
माझ्या धरी ताल

८३

सूर्य क्षणापुरताच
उतरे बिंदूत
निरंतरच आहेस
तू आत्मसिंधूत

८४

देहाच्या गढीत रंगे
षड्‌रिपूंची रात्र
विकलांग होत जाते
एक एक गात्र

८५

**व्यसन**

व्यसन : जाण असून
होते अनावर
माणसातले अखेरी
जागे जनावर

८६

आपण दोघे भेटतो
अनेकांना गूढ
इलाज नाही, नात्यांच्या
कल्पनाच रूढ

८७

आलास तर बसेन
जवळ, ना नाही
राहिले, तशी राहीन
तू नसतानाही

८८

**ध्यान**

श्रद्धेच्या कोनात करी
कर्मरती ध्यान
काळ म्हणे, ' स्मृती तुझी
करीन मी म्यान '

८९

**मौन**

संवाद साधतो मला
पण आपल्याशी
भलत्याशी बोलायला
मी नसतो खुशी

९०

**शोकांतिका**

संध्या अंधारते तेव्हा
        तेज विरे नभी
जीवनाची शोकांतिका
        डोळ्यापुढे उभी

९१

त्या रात्री अंथरलीस
        शेज दोघांसाठी
मुक्त होतो तरीही ना
        उकलल्या गाठी

९२

तू होऊन आलीस ना ?
        मग हो मोकळी
अंगांगातून फुल्ल दे
        माझी स्वप्नकळी

९३

विचारांचा गंध असे
        तो ग्रंथ म्हणावा
आचारांचा बंध असे
        तो संत गणावा

९४

काट्यांचा विचार नको
फुले वेचताना
वर्णाचा मनोरथ घे
यश खेचताना

९५

कृपणाच्या मस्तकात
आकड्यांचे चाळे
अपरात्री उघडतो
तिजोरीचे टाळे

९६

त्याची निष्ठा पेढीवर
तिथे नित्य जाई
विष्ठेतली दमडीही
तो धुवून घेई

९७

समाजाचे अंतरंग
काटेतोल आहे
वजन आणि मालाचे
मोजमाप आहे

९८

माझ्यातून तुझेपण
उणे केले तर
मागे राही हे पोलादी
रिते पक्षीघर

९९

एकटा नसतोस तू
झालास गर्दीचा
नियम कशाला मोडू
आगाऊ वर्दीचा ?

१००

येशील म्हणून डोळे
होते वाटेकडे
प्रतीक्षेने प्रीतीतील
उत्कटता वाढे

१०१

मुखवटे बदलीत
तो झाला प्रधान
नको तेव्हा केले त्याने
नको ते विधान

१०२

लौकिक त्यागिले तरी
निसर्ग माझाच
कडे कपारीत करी
मनमोर नाच

१०३

तुझ्या माझ्या मध्ये आहे
अनंताची दरी
प्रेम कुठेही तरते
विश्वसितावरी

१०४

प्रेमाने पाठविलेस
त्यास भागविले
ते तुझे जाईपर्यंत
उरी जागविले

१०५

पेलवलं नाही तुझं
हृदयस्पर्शित्व
स्वाधीन केलं होतंस
आत्मबोधिसत्त्व

१०६

आरतीत त्याची टाळी
हमखास वाजे
प्रसादाच्या गर्दीत तो
पुढे व्हाया लाजे

१०७

परदुःखाने हर्षित
होणारेच फार
त्यासाठीच येणाऱ्याला
त्यांचे खुले दार

१०८

उद्घोष : सूप्त आत्म्याचा
जागता हुंकार
प्रलयंकारी शिवाच्या
त्रिशूलाची धार

१०९

रति घटकात कटि-
बंधन नसावे
मुक्तीतच मीलनाचे
इंधन दिसावे

११०

'तुमची ती कोण?' एक
प्रश्न हेतूपूर्ण
उत्तरपत्रिका कोरी
शेरा : अनुत्तीर्ण

१११

आपला मार्ग आपल्या
दृष्टीने आक्रमा
उपकारक ठरेल
तीच परिक्रमा

११२

समांतर असावेत
नीतीशी संबंध
प्रीतीशी मात्र उत्कट
आणि अनिर्बंध

११३

वृद्धावस्थेच्या काळात
केवळ चिंतन
एकेक अनुभवाचे
अमृतमंथन

११४

कुठूनही वळसा घे
उधाणाची लाट
धुंद होते आलिंगाया
पाषाणाचा घाट

११५

तसा मी आतल्या आत
असतो मजेत
माझे समाधिस्त मन
अक्षर पूजेत

११६

आत्मदर्शनाची ओढ
लागली जिवाला
भवत्रस्त मन ग्रस्त
विटे वैभवाला

११७

ओढ्या ओहळांच्या संगे
रंगे तृणपाते
प्रलयीही गात राही
सौजन्याचे नाते

११८

मेघमालेच्या पल्याड
तुझी चंद्रशाळा
मनाई न तेथे माझ्या
प्रीति-पुष्पकाला

११९

वर्षाऋतूच्या आरंभी
चहुकडे कृमी
पावसाची वळवळ
अखेर कर्दमी

१२०

तुझ्या चंदनी स्पर्शाने
लोभावेल स्वर्ग
आता मांझ्या असण्याला
तयाचा संसर्ग

१२१

आचमना-स्नानासाठी
नको गंगातीर्थ
उपरतीतून स्रवे
जीवन इत्यर्थ

१२२

आजच्या जगाचा राम
कौशल्याचा पुत्र
तोही राम वनवासी
लक्षात घ्या सूत्र

१२३

प्रीतीची नजर मागे
किंचित् संशयी
तिचे वैरी असतात
छुपे ठायीठायी

१२४

देव पुजावा हवा तो
स्तोम नको त्याचे
देव्हाऱ्याबाहेर मौन
गंधित नात्याचे

१२५

अवकाशाने पेलून
धरलेला मेघ
ढळतो तेव्हा रहात
नाही मागे रेघ

१२६

आहे त्यातील तुझेच
आहे पुष्कळसे
त्या भोवती माझे फक्त
छंदाचे वळसे

१२७

असल्याच्या आनंदात
माझे सुख दाटे
जेथे जातो तेथे मला
भगवंत भेटे

१२८

बाहेर धर्मराज नि
आत दुःशासन
दातृत्वाच्या माथी हेच
'घर'चे शासन

१२९

क्षितिजावर नागांचा
सारखा वावर
गरुडा! झुंज घे
भराऱ्या आवर

१३०

हत्ती गेल्यावर श्वान
तुच्छतेने म्हणे,
' ऐरावताचे हे पुच्छ
शारदेचे लेणे '

१३१

वेशीवरील सरडा
दूर दृष्टिक्षेप
आतबाहेर पाहून
कुठेही घे झेप

१३२

कल्पित मूर्तीत त्याला
दिसला तो तोच
मिरकावून दिली ती
तो अंगांगी पोच

१३३

हवा तिचा संग जोडी
नको त्यांशी नाती
जातिवंत स्नेहावीण
काजळती वाती

१३४

निराळेपण नाहीच
आपणां दोघात
वाहून गेलो असतो
व्यथेच्या ओघात

१३५

मतलबाच्या मुठीचे
संबंध नाण्याशी
आणि महापूजेतील
त्या साधु वाण्याशी

१३६

आता तशी जगण्याची
जरुरीच नाही
छंद जागता राहिला
तर वर्षे काही

१३७

त्याच्या आवारात होते
एक देवालय
पापाच्या पूर्ततेसाठी
विजनात लय

१३८

पाताळातील गुहेत
वेताळाची लूट
पलित्याच्या उजेडात
मोजी ऊठसूट

१३९

संशयात्म्याच्या डोळ्यात
किल्मिषाचे जाळे
टोळाबरोबर त्यात
सापडती भोळे

१४०

आमच्यात वाद आहे
तो तुझ्याबद्दल
म्हणतात ‘ कधीतरी
घडेल अद्दल ’

१४१

दक्षणेच्या भावनेने
दे, द्यायचे तर
देवघेवीच्या वस्त्राला
तलम अस्तर

१४२
किती जणी जाणतात
सावित्रीचे व्रत ?
आणि पडताळतात
आपापली प्रत ?

१४३
दिलेल्याचा उच्चारही
नाही केलास तू
माझेपण मिरवितो
त्या शीलांचा सेतु

१४४
शिवस्वप्नांच्या वाटेत
जावळीचे खोरे
गनिमांच्या जल्लोषात
चंद्रराव मोरे

१४५
तू झालीस शीळाबद्ध
मी कोरली मूर्ति
पाषाणस्थ तुझेपण
माझी झाली कीर्ति

१४६

धुक्याने वेढलो केव्हा
कळलेच नाही
पहाट स्वप्नात होत्या
धुंद दिशा दाही

१४७

धरतीला भेटे जेव्हा
आषाढीचा मेघ
दिसेनाशी होते तिला
क्षितिजाची रेघ

१४८

तुझ्या माझ्या संबंधांत
जिथे तिथे चर्चा
त्यांची असतीस तर
होती पूजा अर्चा

१४९

कृपणाच्या नजरेत
सारेच कौरव
एखाद्याचा केला जरी
शब्दात गौरव

१५०

चिंतेच्या मिठीत मृत्यू
      विषकन्याच ती
डंख हवासा वाटला
      की अतूट नाती

१५१

दिले त्याहून द्यायचे
      आहे किती तरी
अवेळी तरी यायचे
      कितीदा तुझ्या घरी ?

१५२

दिलेत ते प्रकाशात
      अंधारात नव्हे
म्हणून हा भोवताल
      माझ्या पदी लवे

१५३

झुळुकेवरही पीस
      गाठते अस्मान
तुझ्या स्पर्शाने मलाहि
      मिळाले ते स्थान

१५४
भेटीपेक्षा स्वप्नांतच
ती जवळ जास्त
भेटीत नको ते भय
स्वप्नात निर्धास्त

१५५
तळव्यांना जाण आहे
तुझे घेतल्याची
त्या अमेय चैतन्याने
आत्म बेतल्याची

१५६
प्रदक्षिणेच्या कक्षेत
अशीच जागेन
वाटले अखेरी तर
दर्शन मागेन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१५७
तुझा माझा संग आता
स्वप्नांच्या कुशीत
एकाकी शेजेवरील
चुरल्या उशीत

१५८
' शिव 'शौर्याचा विध्वंसा
ज्यांनी केली स्पर्धा
किती झाले नामशेष
कितीकांचा खुर्दा

१५९
चहूकडे वादळल्या
आषाढाच्या सरी
गती नाही उल्लंघाया
दुराव्याची दरी

१६०
तुझ्या पावलातून मी
वळण घेतले
आणि त्यानुसार माझे
आयुष्य बेतले

१६१
मी मला ओळखायला
इतके दिवस
व्यर्थ आता ! उतरली
डोळ्यात अवस !

१६२

तुझा विसर व्हावा
    मरणच हवे
तोवर दर्शनासाठी
    ही पापणी लवे

१६३

अशीच असेन तुझ्या
    भेटीच्या कक्षेत
तुझाच मागेन हात
    विरता रक्षेत

१६४

आत्मा शुद्ध ठेव तुझा
    राम येण्यापूर्वी
अयोध्या दिसेल तुला
    जागणारी उर्वी

१६५

इष्काची धार असावी
    बाजीच्या शस्त्रांना
आणि शौर्याची किनार
    रतीच्या वस्त्रांना

१६६

आत्मगंधासाठी, तुझ्या
भक्तीची सहाण
देह कधीच टाकला
मातीला गहाण

१६७

वेळ आली पूस आता
आंसू लोचनीचे
कधीच न सरायचे
बोलणे मनींचे

१६८

आत बाहेर नित्याचा
चालतो बकवा
तुझ्या संभाषणी नाही
कधीच थकवा

१६९

उण्या अधिकांचा कधी
जमला न ताळा
झाला असेल स्वभाव
त्याने उतावळा

१७०

भेट तुझीच आधीची
कविता नंतर
पण तिनेच ठेविला
स्नेह निरंतर

१७१

कितीही बोलले तरी
राहूनच जाते
असे फक्त घडे जेथे
अनामिक नाते

१७२

सतीचा सर्वनाश जो
आत्मतेजे हरी
द्रौपदीच्या संबंधात
एकच श्रीहरी

१७३

अक्षर रहावे असे
कितीक प्रत्यय
समाधीत हरघडी
येतात व्यत्यय

१७४

येता मी जवळ, घेसी
मागे तू पाऊल
हवे आहे मला तुझ्या
पायातले बळ

१७५

'हवे' 'नको'च्या युद्धात
'नको'चाच जय
'हवे'च्या विजिगीषेचा
धुळीतच लय

१७६

आकाश पोकळ असे
निळाईचा भास
माझ्या भेटीसाठी तुझा
निरर्थ हव्यास

१७७

मुक्त पयोदानी वर्षा
आलिंगी क्षितिजा
चेटकिणीपरी दात
विचकती विजा

१७८

अंधारे कधीच दरी,
    पूर्वा ही काजळे
तुझ्या राहुटीत दिवा
    माझ्यासाठी जळे

१७९

आत्मगंधरूप वाणी
    स्रवते छंदात
जान्हवीच्या काठी योगी
    निळ्या आनंदात

१८०

नेणता साकारे तुझे
    रूप डोळ्यांपुढे
सोसलेले मन, तुझ्या
    चरणांशी कढे

१८१

काटे आणि फुले तशी
    निंदा आणि स्तुती
प्रहरांचा गंध आणि
    जन्माची नालस्ती

१८२
भेट अखेरची आता
एकाकीच जिणे
ग्रीष्मतपे पहाडाचे
जसे दुभंगणे

१८३
राहिलीस जन्मभर
नीतिच्या रेषात
तरी तुझेपण राही
माझ्या उन्मेषात

१८४
घनमालेच्या दर्शनी
मयूरा आनंद
अस्मानी ती, धुळीत तो
तरी पदी छंद

१८५
कुणी म्हणे व्रती, कुणी
हट्टी, एककली
माझ्या यशोवर्धनाची
तीच गुरुकिल्ली

१८६

मुक्त कटीची आसक्ति
तुला नव्हतीच
प्रीतीच्या अक्षयतेची
खूणगाठ तीच

१८७

सखे ! सरले येथेच
बंध ऐहिकाचे
आहेस तू तीच, माझे
जिणे यात्रिकाचे

१८८

ऐकताना माझे, तुला
जाणवले जे जे
नाहीस तू म्हणावया
' हे माझे ते माझे '

१८९

देता येत नाही याची
हवी कशाला खंत
दिलेले तू जागवीन
अखेरपर्यंत

१९०

तुला हवी ती कामिनी
        घेशील कुशीत
ठाव माझाच अखेरी
        येशील पुशीत

१९१

कारणावाचून येतो
        तो ठेवून जातो
कारणे सांगत येतो
        तो घेऊन जातो

१९२

प्रीति भोळी दर्शनेही
        जाई हारखून
धूर्त नीति हातिचेही
        घेई पारखून

१९३

हवे ते मिळावे, ज्याची
        असे हिंमत
पौरुषावर तोलावी
        शौर्याची किंमत

१९४

सागराची शक्ति, मेघ
पृथ्वीपायी वाही
स्वाधीन होण्यात मागे
पुरुषार्थ राही

१९५

शौर्याच्या पहाडावर
प्रीतीची राहुटी
सूर्याच्या साक्षीने देती
आत्म्याची आहुती

१९६

कक्षेत असून तुझ्या
धरतीचा व्यास
कळत नाही तुला का
माझाच हव्यास ?

१९७

अजून येतो जातोस
मी असून अशी
चुकून केली नाहीस
नसती चौकशी

१९८

स्वच्छंद गात्या मनाला
पाखराची लय
आत्मानंदाच्या कैफात
विसरते वय

१९९

अनंतातील प्रेरणा
म्हणजेच देव
तपस्याच्या साधनेची
चिरंतन ठेव

२००

वृद्ध पाहिला की मला
बुद्ध आठवतो
चिंतनात जो मानवी
व्यथा गोठवतो

२०१

साबणाच्या पोटी असे
रिठी शिकेकाई
किती दिखाऊंची उंची
श्रमिकांच्या पायी

२०२

पसायदानात स्वप्न
आहे ज्ञानेशाचे
अर्थच सांगतो आम्ही
त्याच्या उन्मेषाचे

२०३

स्फुरणे आणि विरणे
दोन्ही तुझ्यामुळे
जातीच्या प्रेमिकालाच
ही अवस्था कळे

२०४

अंकुश असह्य होतो
उन्मत्त हत्तीला
विरोध नको असतो
बेछूट वृत्तीला

२०५

आदर्शात सुद्धा, डावा
उजवा दिसतो
आपण ते जपणारे
म्हणून फसतो

२०६

अंधारून आले तरी
जायलाच हवे
जागतील वाड्यातील
पाकोळ्यांचे थवे

२०७

प्रवचकाचा चौरंग
निस्संग असावा
विवेचनातून त्याच्या
व्यासंग दिसावा

२०८

दारे किरकिरतात
तुझी मी आल्ये की
जाण आहे तुझ्या घरी
माझी वजाबाकी

२०९

मनात असून आले
नाही, का ते जाण
हवा तेव्हाच ठेवीन
पायरीशी प्राण

२१०

अंगांगाने झाले तुझी
बुजरा तू किती ?
तुझ्या मिठीत विराया
उन्मेषली रती

२११

माझ्या आयुष्याच्या पथी
तुझी पदचिन्हे
अजून तशीच, जरी
उतरली चिन्हे

२१२

नको त्याच्या विस्मृतीत
हवी त्याची स्मृति
आत्मगंधित होताच
चिरंतन कृति

२१३

तुकयाच्या अभंगात
बोल प्रचीतीचे
कालोदधिच्या तळीचे
शिंपले स्वातीचे

२१४

डोळयांच्या तराजूत स्त्री
पौरुष तोलते
जवळ करी तयाशी
मौनातून बोलते

२१५

मनाने नग्न असतो
एखादा तो योगी
बाकी अंगवस्त्रातील
अव्यक्तांचे भोगी

२१६

त्याची प्रिया अनसूया
नको तिथे दोघे
जग त्यांच्या वागण्याची
चर्चा करी मागे

२१७

आजवर तूच एक
राहिलास पाठी
इतरांना हव्या होत्या
घटकेच्या गाठी

२१८

मौनातील मी असतो
दिगंतस्थ मेघ
आलोचित क्षितिजाच्या
ललाटीची रेघ

२१९

पाण्याचा अंदाज घ्यावा
प्रवाहावरून
आणि आत उतरावे
वळणे हेरून

२२०

ती कुशीत असता
तो भारावून जातो
पृथ्वीच्या कल्याणासाठी
मृत्युंजय होतो

२२१

प्रीती – दोन आत्म्यातील
एक संवेदना
एकाच्या विव्हळण्यात
दुसऱ्याची वेदना

२२२

तुझ्या हव्यासाने वाढे
जीवनाचा अंश
योग्याच्या तंद्रीला हवा
नागिणीचा दंश

२२३

आपला संभोग आहे
आत्म्याच्या ओढीचा
योगायोग नको त्याला
देहाच्या जोडीचा

२२४

एकेका दालनातून
तू आत आलास
झिजणाऱ्या सहाणेचे
चंदन झालास

२२५

मी फक्त पैलू पाडले
आपल्या प्रीतीला
कंठस्थ व्हावे म्हणून
हिऱ्यांच्या जातीला

२२६
येणे तुलाही सुखद
असेल तर ये
देण्यात अलिप्ततेचा
भाव असू नये

२२७
उधळणारा असतो
मनाने मोकळा
उचलणाऱ्याच्या अंगी
नाना ( अव )कळा

२२८
माझ्या अक्षर गुंफेस
भावनांचा पीळ
प्रचीतीच्या चिंतनात
हुंकाराची शीळ

२२९
वासनांवर विजय
काहीसा मिळाला
त्या प्रज्ञात प्रतिभेचा
मोहर गळाला

२३०

फुलल्या वेलीचा सखा
    गंधवाही वायु
गुणग्राहकाच्या संगे
    जीवन चिरायु

२३१

टवाळीत सरे वय
    मृत्यु उभा पुढे
तांबारल्या नजरेत
    पश्चात्ताप कढे

२३२

या वयात ताटातले
    आपले समज
मागल्यांच्या अपेक्षांची
    नको का उमज ?

२३३

मनाच्या वळचणीला
    द्वेषाची राहुटी
अलिप्त राहून देतो
    आत्म्याची आहुती

२३४
मनाचा आक्रोश कधी
थांबतच नाही
हव्यासाच्या हुंदक्यात
आंदोलत राही

२३५
नाते सांगता आले की
हवे ते चालते
ते नसेल तर जग
नको ते बोलते

२३६
'मी तुझा'! ही भावनाच
मला गती देते
आत्मरतीतच खरे
काव्य जन्म घेते

२३७
द्यावे ते दिलापासून
खंत नको मागे
तरच आत्म्याच्या ठायी
हरिपण जागे

२३८

हवं ते मिळालं नाही
म्हणून मी असा
पायी विभूतीमत्वाचा
पाहू नका ठसा

२३९

लाचारीत रुतलास
की उद्धार नाही
तुझे सारे अस्तित्व
दृष्टिआड होई

२४०

कण्यात बाक आला
की माणूस संपला
मागे राहतो तो बैल
घाण्याला जुंपला

२४१

नको त्याच्या संगतीत
मनाचे हो भूत
नास्तिकाच्या स्पर्शानेही
नासे पंचामृत

२४२

घुबडांची वसाहत
        अंधार दरीत
दिवसभर असते
        प्रकाश कोरीत

२४३

शुद्धलेखन संपले
        की पाटी ठेवावी
तोपर्यंतच भावना
        ओवीत गोवावी

२४४

स्त्री ही एक अंगारिका
        उपासना मूर्ति
जागवी जो, त्याची करी
        मन:कामपूर्ति

२४५

कावळ्यांना नका करू
        माझे पिंडदान
त्यांच्याच कावकावीने
        बधीरले कान

२४६
म्हणू नको, ' काही केले
        नाही तुझ्यासाठी '
एकेका कलाकृतीत
        तुझ्या, माझी स्मृति

२४७
उशीर झाला यायला
        तिला, तरी थांब
येणार होती ती, तिचे
        घर आहे लांब

२४८
विशेष रुतलो नाही
        तसा मी मोहात
कालियाची पिले तरी
        आत्म्याच्या डोहात

२४९
वयाबरोबर वाढे
        मृत्यूची सावली
नाना रूपात साकारी
        पावलो पावली

२५०

पावलातली प्रचीति
पापणीत आली
तीच इथे अभंगात
समाधिस्त झाली

२५१

नाण्यावरील पकड
सुटल्याशिवाय
व्यर्थ उद्‌घोषणे आहे
'ॐ नमः शिवाय'

२५२

लाचारी एक मरण
जाणवेल त्याला
ती नामशेष करते
भलभलत्याला

२५३

वळणावळणावर
मी तुला पाहिले
त्यामुळेच तुझेपण
मनात राहिले

२५४

हमरस्ता सोड, आता
पायवाट शोध
अनंताच्या एकांतात
होतो आत्मबोध

२५५

तुझे दान उधळले
आत्मतृप्तीसाठी
माझ्या मोक्षाचे सोपान
इंद्रायणी काठी

२५६

मृत्यो ! देह तुझा, नाही
आत्मा आणि वाणी
ज्यांच्या जागृतीत माझी
रसाळली गाणी

२५७

तुकयाची ध्यानमुद्रा
इंद्रायणी तारी
अनुभवाचे सामर्थ्य
काळालाही भारी

२५८

रतिसंगाची लज्जत
पुरुषार्थ जाणे
इतरांनी उन्मेषांचा
अन्वयार्थ गाणे

२५९

सुख आले दारी तरी
मन हवे राजी
हलवायाच्या थाळीत
कारल्याची भाजी

२६०

स्त्री पहावी तिरकस
अंगोपांगातून
वलयांकित होताना
पदन्यासातून

२६१

रतिसंगात उत्कट
आत्मीयता हवी
तरच तीच ती कृती
भासे नित्य नवी

२६२

माझ्या आत्मरूपा आहे
काळोखाचे अंग
भावनेच्या अंगवस्त्रा
आसक्तीचा रंग

२६३

श्रोते अंगारत त्याच्या
भाषेच्या मुशीत
प्राणांची शपथ घेत
दानाच्या खुशीत

२६४

अहंकाराची लागण
प्रतिष्ठेच्या पोटी
औषधाला सौजन्याची
मात्रा हवी ओठी

२६५

पायपीट पाहवेना
म्हणून ना गेलीस ?
का ? किती दिवस राहू
काळाच्या ओलीस ?

२६६

कमलाच्या संकोचात
      मधुपाची लय
मीलनाच्या समाधीत
      विसरते वय

२६७

न सांगता दूर झाले
      जाणलेस ना का ?
तुझ्या उत्कर्षाची आता
      नको कुणाला शंका

२६८

सरणावर हसत होतीस
      असं ऐकलं
थकलेल्या खांद्यावर
      मरण झुकलं

२६९

रतिरंगात झाकावी
      खिडक्यांची भिंगे
जग हेरीत असते
      आसक्तीची अंगे

२७०

पडदानशील स्त्रीला
नेत्रसुख नाही
झरोक्यातून पौरुष
न्याहळीत राही

२७१

गरुडांची राहुटी ही
पहाडाची शान
त्याची झेप, अस्मानाचे
निळे समाधान

२७२

मंत्र्यांची शुश्रुषा आज
कामिनीच्या हाती
धूळ खात राहतात
सारी गृहखाती

२७३

वापरात असावीत
नाती आणि नाणी
तीच देतात दिलासा
येता आणीबाणी

२७४

कटिबंधात असतो
    स्त्री देहाचा डौल
अटक नसणाऱ्यांना
    तिचा मिळे कौल

२७५

गर्भारपणात रति
    मलूल असते
तिच्या पोटात काहीच
    थरत नसते

२७६

हवे नको त्यांना दिले
    आता हात रिते
कैवाऱ्याचाही मुखीची
    झाकळती स्मिते

२७७

जीभ भेटता टाळ्याला
    रंग कुटाळिला
नारदाने कलहाने
    स्वर्ग विटाळिला

२७८
तिरकस बसलीस
म्हणून पाहिले
आयुष्यात तेवढेच
मनात राहिले

२७९
कटिबंधात लावण्य
उतरू लागले
की रति पाहत नाही
पुढले मागले

२८०
तशी मी कुणाजवळ
कधी गेले नाही
द्यायचे होते तुला ते
दिले सर्व काही

२८१
'तुझ्यासाठीच तो येई'
शेजारी म्हणत
खरं ते, तुझे ऐकून
मी असे कण्हत

२८२

माझे हृद्‌गत जे कधी
उमलले नाही
अक्षरात केलेस तू
कसे गंधवाही

२८३

येताना तुला पाहिले
आहे अनेकांनी
रंगेल आता नको ते
नाते कानोकानी

२८४

विस्मृतीत विरतात
संकल्पांचे तुरे
निरर्थक जीवन मग
नाम मात्र उरे

२८५

वाट पहात होतीस
आलं कानांवर
व्यर्थ संयमिली तुझी
प्रीत अनावर

२८६
पागोळीच्या खाली उभी
अनामिक प्रीति
वरी पर्यंक झुलवी
बेगडी आसक्ती

२८७
अनपेक्षित आलास
घरीच होते ते
तोऱ्यातच म्हणाले, " दे
त्याला हवंय ते "

२८८
अतिवृष्टीने नदीही
पात्र बदलते
तेव्हा बोलतात ओढे
भलतेसलते

२८९
ऐसपैस स्कंधी त्याच्या
बंधुत्वाची शाल
रागलोभ नाही पोटी
ओठी एक ताल

२९०

कुणालाच शक्य नाही
आत्म्याचे हनन
ध्यानमग्न महर्षींचे
हे आहे मनन

२९१

सिद्धार्थाच्या चिंतनाची
चढे मुखी प्रभा
कृतघ्नांचा रोष तुझ्या
मागे असे उभा

२९२

तुकयाला हवे होते
निंदक शेजारी
त्यासाठीच असायचा
तो सदा आजारी

२९३

साप नि मुंगुस दोघे
जन्माचे वैरी
दर्शनीच घडतात
संगिनींच्या फैरी

२९४

शांत रहा आणि ऐका
　　आतला गोंधळ
कळेल बळावलंय
　　किती रिपुदल

२९५

मनातून हवा होता
　　तुझा पुरुषार्थ
तो नाही तर का साधू
　　कुशीतला स्वार्थ ?

२९६

नसतो हरवल्याची
　　तो करीत बेरीज
त्याचे काहीच नसते
　　आळसाखेरीज

२९७

धूर्त असतो सावध
　　बांध्यात कलता
वृत्ती वाण्याची, मनाचा
　　तराजू झुलता

२९८

स्वप्नांची काजळी माझ्या
मनाच्या छताला
नसे जाण भोवतीची
प्रतिभारताला

२९९

पालखीच्या भाराखाली
लवतो का भक्त
हवे हवेच्या कर्दमी
रुततो आसक्त

३००

आवर ते वृत्तीतील
आकांडतांडव
हादरतो आहे त्याने
मुक्तीचा मांडव

३०१

जागलीस आमरण
माझ्याबरोबर
तेव्हाच अंकित
झाली असतीस तर ?

३०२

प्रभंजनाच्या प्रभावे
        पहाड हादरे
अंती अस्तित्व तयाचे
        पाचोळ्यात विरे

३०३

अंधारात स्त्री, बोलत
        नाही, हुंकारते
उत्कंठ ऊर तेव्हाच
        खरे झंकारते

३०४

मागे सरली नाहीस
        जवळ येताना
मोहरत राहिलीस
        देताना घेताना

३०५

तुझ्याच स्मृतीत मन
        जागत राहतं
क्षणिक झुळुकेनेही
        लहरू लागतं

३०६
जिवाला हवं ते,
हाती येते तर ?
अधांतरीच असतं
स्वप्निलांचं घर

३०७
हत्तींच्या साठमारीत
सशांचे मरण
मत्तांच्या गदारोळात
धर्माचे हरण

३०८
लोकांच्या लक्षात येते
तुझे येणे जाणे
आपसात बोलतात
ते आपले उणे

३०९
बोलता बोलता तुझी
उसवते कूस
समाधान हे, मलाच
त्याचा मागमूस

३१०

एकाकी जाशील असं
    नव्हतं वाटलं
सांगायचं ते सारंच
    डोळयात आटलं

३११

डोहाच्या पायरीवर
    मी बसे नहात
वेलींच्या आश्रयाने तू
    असस पहात

३१२

ह्रदगत आपल्यातच
    फुलवून ठेवावे
त्याचे मोल गंधवेड्या
    मधुपांनाच ठावे

३१३

शेज सोडून आसक्ति
    कुठेही कलते
तेव्हा छिद्रान्वेषी जग
    काहीही बोलते

३१४
का फिरत राहिलास
माझ्याच कक्षेत ?
धन्यता दर्शवलीस
अपुऱ्या भिक्षेत ?

३१५
सांगायचं ते सांगून
टाक सांगोपांग
प्रसादासाठी दैवत
नमावं मुक्तांग

३१६
लक्ष्मीला जाणीव आहे
चंचलपणाची
सहसा ती होत नाही
अंचल गुणाची

३१७
स्वहिताचा धंदा
मला जमलाच नाही
प्रचीतीला होती हाती
अभंगांची वही

३१८

पायरीनेच चढावी
लोभावी नजर
चुकली तर जाळील
क्रोधाचे जहर

३१९

तिचे जाणे कुणालाच
तसे नको होते
पण मी ऐकिली होती
तिची उच्छ्‌वसिते

३२०

येणारा हरेक म्हणे
बुद्धि हिची तैल
साऱ्यांना मी घडीभर
हवी होते सैल

३२१

'छत काजळू नये' ही
पणतीला खंत
दलितांच्या हुंदक्याने
व्याकुळती संत

३२२
सत्तांतराच्या खोऱ्यात
युद्धाच्या ठिणग्या
धुमसतात प्रवृत्ती
बाजार बुणग्या

३२३
उपदेशक बोलून
बोलून थकतो
श्रोता तो, ' चोथा ' म्हणून
थुंकून टाकतो

३२४
असूयेच्या बटव्यात
द्वेषमूळ मात्रा
नको त्यांची संपविते
लौकिकांची यात्रा

३२५
लुसलुशीत हिरवळ
सशाची चंगळ
तिथेच लुडबुडतो
उंदीर ओंगळ

३२६

उपरतीच्या बुद्धीला
सूक्तांची आवड
दिखाऊ येरांची चाले
चिवडाचिवड

३२७

तुझ्या नितळ देहाचा
स्पर्श मनामधी
जाशी अग्नीच्या आहारी
होता अन्त्यविधि

३२८

तू बाहेर आलास
की मी दाराशी येते
त्यांना नाही आवडत
संबंध नको ते

३२९

उपरतीच्या पुत्राचे
नाव अग्निमित्र
विश्वकल्याण मनात
संचार सर्वत्र

३३०

प्रलोभनाच्या घडीला
तुझेच स्मरण
शीलांकित जीवनाचे
फुटे न धरण

३३१

दिवाभीताच्या नजरेला
नकोसा प्रकाश
आकसून अंधाराला
अंगांग भकास

३३२

कृपण कुबेर झाला
तरी दैन्य तेच
अमृताचा घास कसा
सेवू, मना पेच

३३३

माझी मानस धनश्री
कमल दलात
नसेना का कुणीही मी
इथे भूतलात

३३४
डबक्याच्या चिखलात
जित्राणूंची पिले
जिव्हेतून स्त्रवे त्यांच्या
विष काळे निळे

३३५
तू गेलीस बरे झाले
हे माझ्या दृष्टीने
प्रीतीची मोजणी होते
नीतीच्या यष्टीने

३३६
सर्वांना एक नसते
वस्तूंची किंमत
देता तोलीत असतो
घेत्याची हिंमत

३३७
लाखात मोजावी ज्यांची
बँकेतली ठेव
इतरांच्या अनर्थाची
त्यांना उठाठेव

३३८
देणारे पुष्कळ होते
तुझेच घेतले
विश्रांतीचे अंगवस्त्र
त्यानेच बेतले

३३९
आजचा काळ युद्धाचा
आहे सावधान
इथे तिथे करू नको
बुद्धाचे विधान

३४०
आपल्यावर खिळावी
आपली नजर
आतले शत्रू कधीही
होतील हजर

३४१
पाशात पडलो आहे
तुझ्या बाहूंच्या
सलते आहे मनात
ते द्वेष-ब्राहूंच्या

३४२

कडं शोभून दिसतं
पोलादी दंडात
काळ गात राही
त्यांची झेप त्रिखंडात

३४३

आत्ममग्न राही
त्याच्या चिदानंद देही
कोण मी हे कळे तेव्हा
पदी दिशा दाही

३४४

देहांत मलाही हवा
होता एके काळी
तुझे असून नसणे
जेव्हा जिवा जाळी

३४५

उरोजाच्या तटावर
आसक्ति स्फुरते
स्वप्न कामनापूर्तीचे
मनात तरते

३४६
माझे हरवलेले मी
शोधित बसतो
वाचलंय, ' आत्मदग्ध
आसक्त नसतो ' !

३४७
नको त्यांची ये-जा अशी
थांबणार नाही
ओढून घे दार तुझे
आपुलाच राही

३४८
आता स्थिती आणि गती
अंत ठरलेला
ठेऊ नकोस पेल्यात
घोट उरलेला

३४९
तुझ्या गौरव गाथेचे
जपले निर्माल्य
गंध लुटला दिशांनी
माझ्या उरी शल्य

३५०

चंद्र उतरू दे भाळी
 कंठी कढो विष
तप चढते कैलासी
 एकेक निमिष

३५१

वृद्धत्वी ध्यान असावे
 व्रतस्थ बुद्धाचे
नसावेत अग्निमुखी
 पवित्रे युद्धाचे

३५२

पूजा करीत होतीस
 अखेरी अखेरी
ओळखले मी, थांबली
 होती माझी फेरी

३५३

नामस्मरण : मनाचा
 एकांतिक जप
अचूक साधला तर
 सिद्धार्थाचे तप

३५४
माळ पुरी करूनच
जाशील वाटलं
आता काय ? तुझेपण
कंठाशी दाटलं

३५५
हवं त्या नात्यांनी तुला
तोलून पाहिलं
तराजूत फक्त तुझं
देवत्व राहिलं

३५६
' संत किंवा कवि ? ' ठेवा
चर्चा काळावर
तुम्हा आम्हा सामान्यांची
अर्चा अर्थावर

३५७
भावरूप मन होता
देहाचा देव्हारा
पायरीशी आलेल्याला
निःसंग निवारा

३५८

प्रसन्न मनाला नित्य
दसरा दिवाळी
इच्छाभोजना तयाच्या
द्रौपदीची थाळी

३५९

प्रज्ञा जडावे अभ्यासे
ज्ञान ग्रंथबद्ध
कशी अपेक्षावी त्यांची
वाणी रससिद्ध

३६०

पावलात आली दिशा
तुझ्या प्रेरणेने
छंदोपनिषद माझे
जीवनाचे लेणे

३६१

व्यवसायावर निष्ठा
असली म्हणजे
बोथटतात काळाचे
करवती पंजे

३६२

उधाणाच्या आसक्तीचा
उन्मेष आगळा
बघे कवेत घ्यावया
किनारा सगळा

३६३

हेच पावलागणिक
क्षीण रक्तस्रावे
तू न कुणाची फुंकर
आता मनोभावे

३६४

दे‌ऽहाऱ्याच्या चिऱ्यासाठी
त्याचे सारे काही
वेळी अवेळी उठून
करीत राही

३६५

तुझी स्मृति, माझी पूजा
नित्य नैमित्तिक
मला हवी तशी होती
दृष्टि साहित्यिक

३६६

प्रीतिला स्वरूप नाही
गंध मात्र आहे
त्या गंधछंदिताशी मी
कटिसिद्ध राहे

३६७

माझ्या भावगर्भातच
उतरलास तू
कुणापासून लपवू
सांग आता हेतू ?

३६८

रति संपर्काने गति
येते पौरुषाला
उगाच मस्तानी होती
बाजीच्या उशाला ?

३६९

सांडपाण्यात डासांची
पिळावळ जास्त
त्यामुळे हिंवतापाने
भोवताल त्रस्त

३७०

शिवसृष्टीत सर्पांना
वाव अनिर्बंध
किंबहुना त्यांचे विष
हेच त्याचे गंध

३७१

मस्तीत जगणाऱ्याने
लाचार नसावे
खरे, पण तसे त्याचे
आचार असावे

३७२

गंगास्पर्शानि द्यायची
असते दक्षिणा
भावानुवर्ती असावी
तशी प्रदक्षिणा

३७३

अयाचिताला जाणून
झालीस मार्गस्थ
कृतज्ञतेच्या अभावी
मन हे अस्वस्थ

३७४

मर्दानी स्पर्शाने जेव्हा
हुंकारते वक्ष
अंगांगातून कामिनी
प्रीतीची दे साक्ष

३७५

तुझ्या हृद्य संगमीचे
फूलपंखी क्षण
स्वर संवादी तयांच्या
ओढ विलक्षण

३७६

प्रमत्तांच्या तांडवात
असंख्यात भोगी
एखादाच सिद्धारूढ
एकचित्त योगी

३७७

कोल्हेकुईने थरारे
श्वानाचे शेपूट
गल्लीतल्या अन्नावर
ज्याची लयलूट

३७८

हाताशी असावे असे
एखादे पुस्तक
ज्यातील भावसृष्टीत
आपले हस्तक

३७९

आत्म्यातून उमलते
मंदिराची वाट
दैवतांच्या स्नानासाठी
पापण्यांचे काठ

३८०

समतेच्या भावनेने
मिटवावे भेद
उद्याचा जगत् ग्रंथ
आहे सामवेद

३८१

माझा 'आज' उमलतो
निदिध्यासातून
'काल' रंगत राहिला
पदन्यासातून

३८२

तो राहिला नको त्याशी
संबंध जोडीत
सांधलेली नाती अखेर
निघाली मोडीत

३८३

दिगंताच्या पौरुषाला
कामिनीची कूस
भारावलेल्या मेघाला
बिजलीची कूस

३८४

चौकटीत शोभणारे
नाही माझेपण
चेहऱ्यावर अजून
नियतीचे व्रण

३८५

रतिसंगाची अखेर
व्हावी समाधीत
दिल खेचक स्वप्नांचे
स्वर संवादीत

३८६

पुष्कळदा मी कुठेच
पाहत नसतो
बघणाऱ्याला पुतळा
कसाही दिसतो

३८७

पुरंध्रीच्या स्तनाग्रात
पौरुषाची नस
पौर्णिमेच्या चांदण्यात
तरंगे अवस

३८८

तू गेलीस कळताच
वाणी मौनगत
रित्या मनी मेघापरी
भारावे स्वगत

३८९

वळणावर सावध
ऐस ! कलशील
काळानेही गावे असे
तुझे कुलशील

३९०

दुसऱ्यांना तोंडसुख
 देतात सहिष्णु
पृथ्वीचे पालनकर्ते
 तेच खरे विष्णु

३९१

रसाळलेल्या फळाचे
 आस्वादक पक्षी
समीक्षेतून साकारे
 प्रतिभेची नक्षी

३९२

जाणणाऱ्यांनी जाणले
 माझीच होतीस
प्रकाशाशी नाते कुणी
 पुसे का ज्योतीस ?

३९३

कधीच चढले नाही
 तू दिलेले मद्य
जाण होती तुझे देणे
 असणार हृद्य

३९४

मी कललेला राहिलो
तो तुझ्या अंगाने
ते वामांग नव्हते हे
कळले संगाने

३९५

मी मोकळी होते तेव्हा
कुणाची नसते
वर्षाधारा उन्मादात
दिगंताची होते

३९६

वृंदावनाच्या कक्षेत
फुलते तुळस
बाजूच्या देवालयाचा
कलतो कळस

३९७

अनेकांना सले तुझा–
–माझा परिचय
प्रश्न अध्याहृत 'दोघे
कशी एकलय ?'

३९८
मैफिलीत तो असतो
रस-गंगाधर
भिजवितो कामिनींच्या
दिलाचे पदर

३९९
मुरलेले मद्य त्याला
खिळवून ठेवी
शेजेपुरत्याच मग
त्याच्या उठाठेवी

४००
क्रोधाविष्टाची अखेर
विरते राखेत
कणा वाकता पाठीचा
कुबडी काखेत

४०१
प्रमेयांच्या प्रश्नात तो
चिरेबंदी झाला
कुणीच जाणले नाही
त्या अनामिकाला

४०२

धनकोच्या ध्यानी मनी
दिल्याचीच नोंद
चक्रवाढ व्याजासवे
वाढे त्याचे दोंद

४०३

कक्षेतील उपभोग
ज्यांनी नाकारले
त्यांच्यातीलच पौरुष
अंती साकारले

४०४

माझ्यातून तुझेपण
उणे केले तर ?
उरणारच नाही मी
मागे त्यानंतर

४०५

ती हुंकारलीच नाही
जवळिकीसाठी
तरी तिच्या कंचुकीच्या
उतटल्या गाठी

४०६

आडोशालाही मोकळी
होताना ती लाजे
तिचा तेवढा एकांत
अळवाला खाजे

४०७

दिगंताच्या ओढीने
ज्या पावलांना गति
त्याच्याच भोवती घाली
प्रदक्षिणा क्षिती

४०८

आंबेवनात पिकल्या
कावळ्यांची फेरी
प्रीतिभोवती जातीच्या
कुंपण काटेरी

४०९

नकोशीच्या संबंधात
पोखरते मन
लाकडाचे घर होते
वाळवीचे धन

४१०

विषण्णतेतच आता
      आयुष्याचा अंत
अंतरीच्या काळोखात
      मरण, ही खंत

४११

प्रलोभनाच्या घडीला
      गुंते न मोहात
त्याचे साधुत्व तरते
      काळाच्या डोहात

४१२

सुरवंटापरी तुझा
      वैरी कौकारांत
सावधान ! थबकेल
      कधीही घरात

४१३

जीर्ण वडाच्या तळाशी
      रेंगाळती भुते
न्याहळीत भूलोकींची
      ओळखीची प्रेते

४१४

मांडव मोडला मी, तरी
उखडेना मेढ
पिढ्यापिढ्यात जागती
चौऱ्यात तेढ

४१५

भावसमृद्ध मी आज
असे त्यात तृप्त
हवे हवेच्या जगात
राहूनही अलिप्त

□

ग्रंथसंग्रहालय ठाणे
२४६१
२३४४८
REFBK-0025558
REFBK-0025558